।। श्री ।।

वेदोऽखिलो धर्ममूलम् । धर्मो रक्षति रक्षितः । तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते ।

# वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे


२०४६,सदाशिव पेठ, पुणे-४११० ३०. ☎ ०२०-२४३३१६२२/९३०९२७३०५२

Email - vedsabha@gmail.com Website-www.vedsabha.org


-------------------------------------------------------------------

जा.क्र. **१८**/२०२६-२७

आषाढ शुद्ध १ शके १९४८

दिनांक : १५ जुलै २०२६

## परिपत्रक

वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या यंदाच्या वार्षिक परीक्षा मिती **आश्विन- शुद्ध १२ शके १९४८ ते आश्विन -कृ. ६** (दि. २३ ऑक्टोबर २०२६ ते दि. ३१ ऑक्टोबर २०२६) या कालावधीत होतील.

१. आवेदनपत्रे पूर्णपणे व्यवस्थित भरून आपल्या पाठशाळेच्या गुरुजींमार्फत श्रावण शु. ९ **(दि. २१ ऑगस्ट २०२६)** पर्यंत सभेच्या कार्यालयात पोहोचतील अशा प्रकारे पाठवावीत. ऑफलाईन पद्धतीने पाठविलेली आवेदनपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२.श्रावण शु. ९ **(दि. २१ ऑगस्ट २०२६)** पर्यंत आवेदनपत्रे स्वीकारली जातील. नंतर येणाऱ्या आवेदनपत्रांसाठी **परीक्षा शुल्कसह विलंब शुल्क** आकारले जाईल. विलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्वीकारण्याचा अंतिम दि. ३१ ऑगस्ट २०२६ (श्रावण कृ. ३) राहील. दि. २२ ऑगस्ट २६ पासून आवेदनपत्र भरताना परीक्षा शुल्क व विलंब शुल्क भरणे अनिवार्य आहे. दि. ३१ ऑगस्ट २०२६ नंतर येणारी आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. **प्रार्थनापत्र भरण्याची प्रक्रिया बदललेली असून त्याची सविस्तर माहिती शेवटी दिली अरहे. ती पूर्णपणे वाचून नंतरच प्रार्थनापत्र भरावे.**

**३.आश्विन-कृष्ण-सप्तमी दि. १ नोव्हेंबर २०२६ या दिवशी सायंकाळी पदवीदान समारंभ संपन्न होईल.**

**४.परीक्षांचे शुल्क पुढीलप्रमाणे -**

| परीक्षेचे नाव | परीक्षा शुल्क | विलंब शुल्क | अनामत |
|---|---|---|---|
| प्रवेश परीक्षा | ३००/- | ३००/- | नाही |
| भागश: अभिज्ञ | ४००/- | ४००/- | नाही |
| संहितापाठी | ५००/- | ५००/- | नाही |
| संपूर्ण अभिज्ञ | ७००/- | ७००/- | नाही |
| भागश: कोविद | ७५०/- | ७५०/- | नाही |
| संपूर्ण कोविद | १,०००/- | १,०००/- | नाही |
| सांग क्रमांत (कोविद) संपूर्ण (ऋग्वेद) | १,२५०/- | १,२५०/- | नाही |
| चूडामणि | २,०००/- | २,०००/- | ३,०००/- |
| सांग चूडामणि (घनान्त) संपूर्ण (ऋग्वेद) | २,५००/- | २,५००/- | ३,०००/- |

५. यावर्षी चूडामणि व सांग चूडामणि (घनान्त) परीक्षेसाठी रु. ३०००/- अनामत शुल्क भरणे आवश्यक आहे. शुल्क परीक्षेस उपस्थित राहिल्यावर परत मिळेल.

६. परीक्षांचे शुल्क पाठविताना वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या बँक खात्यात पाठवावे. (वेदशास्त्रोत्तेजक सभा, सेंट्रल बँक, टिळक रोड शाखा, सेंट्रल बँकेव्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेत परीक्षाशुल्क स्वीकारले जाणार नाही.

**सेंट्रल बँक ऑफ इंडिया, टिळक रोड शाखा**

**वेदशास्त्रोत्तेजक सभा**

**खाते क्र. ५४९६९९७१८२**

**IFSC Code CBIN0280663**

**चेक स्वीकारले जाणार नाहीत.**

७. प्रत्येक परीक्षेसाठी स्वतंत्र आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे. प्रत्येक आवेदनपत्रावर आधार क्रमांक घालणे आवश्यक आहे.

८. **प्रत्येक विद्यार्थ्याने परीक्षेस येताना आधार कार्ड जवळ बाळगणे बंधनकारक आहे. आधार कार्ड नसेल तर परीक्षेस बसू दिले जाणार नाही.**

९. कोणत्याही वेदाच्या शाखेची संहिता परीक्षा विद्यार्थ्यास स्वतंत्रपणे देता येईल. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांना संहितापाठी म्हणून प्रमाणपत्र दिले जाईल.

१०. **परीक्षेस बसणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यांना प्रवास खर्च दिला जाणार नाही.**

११. परीक्षेस येताना कोणतीही मौल्यवान वस्तू सोबत आणू नये. (टॅब, दागिने इत्यादि) वस्तू हरवल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

१२. अपरिहार्य कारणास्तव एखाद्या विषयाची परीक्षा रद्द/स्थगित करण्याचा अधिकार सभेकडे राहील.

१३. अध्यापकांचे मानधन अध्यापकांच्या बँक खात्यात जमा केले जाईल त्यासाठी प्रत्येक **अध्यापकाने आपल्या पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत आवेदनपत्रासोबतच सभेच्या ९३०९२७३०५२ या क्रमांकावर पाठवावी.** त्यामुळे आपल्या खात्याची माहिती (बँकेचे नाव, शाखा, शहर, IFSC कोड, खाते क्र., खातेदाराचे नाव) व्यवस्थित मिळेल व मानधन पाठविणे सोईचे जाईल. या व्यतिरिक्त कोणत्याही मार्गाने (मनिऑर्डर, ड्राफ्ट, चेक इत्यादि) मानधन दिले जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. एखाद्या पाठशाळेत एकापेक्षा अधिक अध्यापक असल्यास प्राचार्य/पाठशाळा/कोणातरी एका अध्यापकांच्या बँक खात्याचे विवरण पाठवावे. मानधन व पारितोषिकाचे विवरण अध्यापकांना ई-मेलवर पाठविले जाईल.

१४. सभेची कुठल्याही विषयाची संपूर्ण अभिज्ञ परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विशारद (बी.ए.) प्रथम वर्षात प्रवेश घेता येईल. तसेच इतर विद्यापीठांच्या परीक्षांनाही प्रवेश घेता येईल.

१५. सभेची अभिज्ञ (संपूर्ण) परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्याला कोविद (संपूर्ण) परीक्षा द्यावयाची असल्यास दोन वर्षांच्या खंडानंतर ही परीक्षा देता येईल. मधल्या दोन वर्षात विद्यार्थी भागशः कोविद परीक्षा देऊ शकतो.

१६. वक्तृत्व परीक्षेचा निर्धारित विषय पुढीलप्रमाणे -

* ननु लक्ष्मी: फलमानुषङ्गिकम्

**अथवा**

* परीक्षा राक्षसी खलु ।

**परीक्षेसंदर्भात अधिक माहितीसाठी संपर्क -**

**वे.मू. शेखर घैसास** - ०९८२२५५३६०७,

**वे.मू. दत्तात्रय जोशी** - ८३०९०६२८९३ (दक्षिण भारतातील विद्यार्थ्यांसाठी)

**वेदशास्त्रोत्तेजक सभा**-(दुपारी १२ ते सायं ६:००) ९३०९२७३०५२,०२० २९९८०४४२

**निवास व्यवस्था** - श्री. संजय सिंग ७९७२१६६८५८

प्रार्थनापत्र भरताना खालील सूचनांचे अनुसरण करावे.

१. प्रत्येक नवीन विद्यार्थ्याला नोंदणी करणे आवश्यक आहे.

२. त्यासाठी खालील लिंकचा वापर करावा.
http://65.1.255.134/Vidyarthi.

३. वरील लिंकवर क्लिक करून New registration या पर्यायाचा वापर करून सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने पासवर्ड आपला आपण तयार करायचा आहे. प्रत्येकाने आपले नाव, वडिलांचे नाव व आडनाव देवनागरी आणि रोमन या दोन्हीही लिपीत भरणे आवश्यक आहे. आधार क्रमांक टाकून आधारकार्डाची पीडीएफ किंवा स्कॅन कॉपी जोडणे आवश्यक आहे. तसेच स्वत:चा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, अध्यापकांचे नाव, पाठशाळेचे नाव, पाठशाळेचा पूर्ण पत्ता (राज्यासह) घालणे बंधनकारक आहे. प्रत्येकाने आपला पासवर्ड लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे. पाठशाळेच्या यादीत पाठशाळेचे नाव आणि अध्यापकांच्या यादीत अध्यापकांचे नाव नसल्यास संस्थेशी संपर्क करावा.

४. एखाद्या विद्यार्थ्याने पूर्वी परीक्षा दिली असेल आणि आधार क्रमांक टाकला असेल तर त्याला Forgot password असा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करून त्याने नवा पासवर्ड तयार करायचा आहे. ज्यांनी आधार क्रमांक टाकला नसेल अशा माजी विद्यार्थ्यांनी सभेशी संपर्क करावा.

त्यानंतर सर्व माहिती भरून CAPTCHA टाईप करून नावनोंदणी करावी.

५. नावनोंदणी केल्यावर विद्यार्थ्याला प्रार्थनापत्र भरता येईल. त्यामध्ये विषयाचे नाव ,पदवी निवडावी. त्यानंतर जी परीक्षा द्यायची असेल ती निवडावी.

६. नंतर विद्यार्थी किंवा अध्यापक हे प्रार्थनापत्र ड्राफ्ट म्हणून Save करू शकतील.

७. draft स्वरूपात Save केलेल्या प्रार्थनापत्रामध्ये अध्यापक बदल करू शकतात.

८. एकदा प्रार्थनापत्र सबमिट केल्यावर कुठल्याही परिस्थितीत बदल होणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

९. तत्पूर्वी अध्यापकांनी स्वत:ची नावनोंदणी करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी पाठशाळेला व अध्यापकांना लॉगिन करावे लागेल. user Id /password सभेकडून दिला जाईल. यासाठी कृपया सभेकडून पाठविलेला Whatsapp message बघावा त्यावर पासवर्ड न मिळाल्यास सभेशी संपर्क करावा. अध्यापकांसाठी अथवा पाठशाळेसाठी पुढील लिंकचा वापर करावा.

http.//65.1.265.134/pathashala

१०. त्यानंतर डॅशबोर्ड दिसू लागेल. त्यावर क्लिक करावे. त्यामध्ये अध्यापकांना

परीक्षार्थींनी भरलेली प्रार्थनापत्रे दिसतील. विद्यार्थ्यांनी भरलेली माहिती अध्यापकांनी तपासणे आवश्यक आहे. परीक्षेमध्ये बदल करायचा असेल (चुकीची परीक्षा भरली असल्यास) तर अध्यापक येथे तो बदल करू शकतात. नंतर कोणताही बदल करता येणार नाही.

११. नंतर निवडलेल्या परीक्षांप्रमाणे आकारलेले शुल्क समोर दिसेल त्या प्रमाणे अध्यापकानी किंवा विद्यार्थ्याने स्वतः शुल्क भरणे आवश्यक आहे.

१२. शुल्क भरण्यासाठी सर्व प्रकाराचे online transaction open ठेवले आहेत. भरलेले शुल्क कमी जास्त झाल्यास ते सभेकडून स्क्रीन वर ऑटोमॅटिक दिसेल.

१३. शुल्कासह भरलेले प्रार्थनापत्र हे सभेकडून मंजूर झाल्यावरच ते विद्यार्थी परीक्षेसाठी पात्र धरले जातील. **दि. १ सप्टेंबरनंतर परीक्षेस पात्र विद्यार्थ्याला केंद्र व परीक्षा दिनांक स्क्रीनवर दिसेल.**

ही सर्व प्रक्रिया यावर्षीपासून सुरू करण्यात येत आहे. तरी सर्वांनी सभेला सर्वप्रकारे सहकार्य करणे अपेक्षित आहे. कुठल्याही विद्यार्थाचे नुकसान होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाईल.

जसे गेली अनेक वर्ष आपण सहकार्य करीत आहात तसे पुढे पण आपण कराल ह्याची मला खात्री आहे.

काहीही अडचण आल्यास सभेच्या मोबाईलवर फोन किंवा मेसेज करून नोंद करू शकता.

अधिक माहितीसाठी संपर्क - फोन नं. ९३०९२७३०५२ दुपारी ३ ते ६

श्रीमती श्रद्धा परांजपे
कार्यवाह
वेदशास्त्रोतेजक सभा, पुणे